सोलापूर महानगरपालिका

जा.क्र.एसीटी/१/ ४२८
मालमत्ता कर कार्यालय,
सोलापूर .दिनांक:२५-०८-२०२२

*** कार्यालयीन आदेश ***

*** अवैध इमारतीवर तसेच वापर परवाना न घेतलेल्या इमारतीवर शास्ती लावणेबाबत ***

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २६७-अ सोलापूर महानगरपालिका मालमत्ता कर विभागामार्फत सध्या अवैध इमारती /वापर परवाना/वापरात बदल/वाढील बांधकाम बाबत पुढील प्रमाणे शास्ती लावणेबाबत सोलापूर महानगरपालिका प्रशासक ठराव क्रं.४० दिनांक ०३-०६-२०२२ अन्वये धोरणात्मक मान्यता दिलेली आहे.

१) अवैध बांधकामावर मालमत्ता कराच्या दुप्पट रक्कम शास्ती लावण्याची कार्यवाही करावी.
२)बांधकाम परवानगी घेतला आहे मात्र वापर परवाना न घेतलेल्या मिळकतदारांच्या मिळकतीवरती मालमत्ता कराच्या ५०% रक्कम शास्ती लावणे.
३)ज्या मिळकतीचा ज्या वापरासाठी बांधकाम खात्याची परवानगी घेतली आहे व त्यानंतर त्याचा वापरात बांधकाम खात्याची परवानगी न घेता बदल केला असल्यास त्या मिळकतीवर मालमत्ता कराच्या ५०% रक्कम शास्ती लावणे.
४) बांधकाम परवानगी क्षेत्रा पेक्षा वाढीव बांधकाम केल्यास वाढीव बांधकामाच्या क्षेत्रावर मालमत्ता कराच्या दुप्पट रक्कम शास्ती लावणे.

सदर शास्तीचे अंमलबजावणी पुढील आर्थिक वर्षापासुन लागु करणेत येत असुन सर्व कर निरीक्षक यांनी उपरोक्त प्रमाणे मिळकतदार यांचेकडे मिळकतीचे बांधकाम परवाना /वापर परवाना आहे किंवा असे याबाबत खात्री करुन त्यानुसार कर निर्धारण व मुल्य निर्धारण करणेची कार्यवाही ठेवण्यात यावी. यामध्ये कोणत्याही प्रकारचे कसुर होता कामा नये अन्यथा संबधित सेवकांस जबाबदार धरणेत येवून मनपा अधिनियमानुसार उचित कारवाई करणेत येईल यांची नोंद घ्यावी.

मा.आयुक्त यांचे आदेशानुसार

२५/०८/२२

उपायुक्त (मालमत्ता कर)
सोलापूर महानगरपालिका

प्रत-
1.उपायुक्त (मालमत्ता कर ) विभाग.
2. मुख्यलेखापरिक्षक.
3. सहा.आयुक्त (मालमत्ता कर ) विभाग

प्रति-
1.अति.मालमत्ता कर अधिकारी
2.सहा.मालमत्ता कर अधिकारी
3. सर्व कर निरीक्षक / वसुली सेवक

# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

इंद्रभुवन' आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३ ००१.
(मालमत्ता कर विभाग , इंद्रभुवन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक.)

जा.क्र.उपायुक्त (कर)/९२ दि. २३/१२/२०२४

**-: कार्यालयीन आदेश :-**

विषय :- अवैध इमारीतीवर व वापर परवाना न घेतलेल्या इमारतीवर शास्ती लावणेबाबत पारीत झालेल्या ठरावाबाबत..

संदर्भ :- १. महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश २०१७ (अध्यादेश क्र.३)
२. शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१५/प्र.क्र./३०५ नवि-२० दि.११/०१/२०१७
३. मा.प्रशासक ठराव क्र.४० दि.०३/०६/२०२२ (मा.सर्वसाधारण सभा संदर्भ)
४. जा.क्र.एसीटी/९/४२४ दि.२५/०८/२०२२ चे कार्यालयीन आदेश
५. मालमत्ता कर विभागाकडील टिपण्णीस मा.आयुक्त यांची दि.११/१२/२०२४ अन्वये मान्यता.

सोलापूर महानगरपालिका मालमत्ता कर विभागामार्फत अवैध इमारतीवर शास्ती लावणे अनुषंगाने संदर्भ क्रमांक १, २ यास अनुसरुन संदर्भ क्र. ३ अन्वये ठराव पारीत झालेला आहे. त्यास अनुसरुन संदर्भ क्र.४ अन्वये कार्यालयीन आदेश पारीत झालेले आहेत. तसेच अवैध बांधकाम शास्तीची अंमलबजावणी दि.०१/०४/२०२३ लागू करणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

तथापी उक्त ठरावास व कार्यालयीन आदेशास अनुसरुन मालमत्ता कर विभागाकडून अवैध व अनधिकृत बांधकामे अथवा वापर परवाना नसलेल्या इमारतीची निश्चिती करणे, त्यांच्यावर महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ नुसार कार्यवाही करणे हि बाब कर विभागाशी निगडीत नसताना तसेच अधिकार कक्षा नसताना वा तशी अनधिकृत इमारती निश्चित करण्याचे कोणतेही अधिकार या तांत्रिक अर्हता नसताना अशी कार्यवाही कर विभागामार्फत केली जात होती. सबब संदर्भीय आदेशामध्ये सुधारणा करणे आवश्यक असलेने, संदर्भ क्र.५ चे टिपण्णीस मा.आयुक्त यांनी उपरोक्त अध्यादेश, अधिनियमातील सुधारणा तसेच शासन निर्णयातील निर्देश पहाता, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २६७-अ मधील तरतुदीनुसार खालील प्रमाणे सुधारणा करणेस मान्यता दिलेली आहे.

१. प्रत्येक पेटेतील बांधकाम परवाना दिलेल्या इमारतीचा तपशील प्रतिमहा बांधकाम परवाना विभागाने कर विभागास पाठवावा.
२. परवाना प्राप्त न करता चालू असलेल्या बांधकामाची यादी संबंधित कर निरिक्षक यांनी उपसंचालक नगर रचना किंवा उप अभियंता (बांधकाम परवाना) यांच्याकडे उपायुक्त (कर) किंवा सहायक कर निर्धारण व वसुली अधिकारी यांच्यामार्फत पाठवावी.

३. सदरील यादीनुसार अवैध, अनाधिकृत बांधकामाची निश्चिती व शास्तीची आकारणी व वसुली करण्याची शिफारस बांधकाम परवाना विभागाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २६७ (अ) नुसार कार्यवाही करुन तशी यादी कर विभागास द्यावी
४. सदरील यादी प्राप्त झाल्यास त्याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २६७ (अ) व कलम १२८ नुसार कर विभागाने स्वतंत्रपणे कार्यवाही करावी.

उपरोक्त आदेशास अनुसरुन कर निरिक्षक यांनी मिळकतदार यांचेकडे मिळकतीचे बांधकाम परवाना / वापर परवाना नसल्यास संदर्भ क्र.४ चे कार्यालयीन आदेशानुसार आकारणी न करता सदर इमारतीची नियमित आकारणी करुन या आदेशानुसार पुढील कार्यवाही करावी. याआदेशानंतर संदर्भ क्र. ४ नुसार नगर रचना / बांधकाम परवाना विभागाचे आदेश नसताना अवैध बांधकाम शास्तीची आकारणी केल्याची तक्रार आल्यास त्यास संबंधित कर निरिक्षक जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

(आशिष लोकरे)
**उपायुक्त (कर)**
सोलापूर महानगरपालिका.

प्रती,
१. सर्व कर निरिक्षक

प्रत,
१. उप संचालक, नगर रचना कार्यालय
२. सहा.संचालक नगर रचना, कार्यालय
३. उप अभियंता, बांधकाम विभाग,
४.सहा.अभियंता, बांधकाम विभाग
माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव

प्रत,
संगणक प्रोग्रॅमर, संगणक विभाग,
आवश्यकत्या कार्यवाहीस्तव

सोलापूर महानगरपालिका

जा.क्र.एसीटी/9/ ४२५
मालमत्ता कर विभाग
दिनांक २५/08/2022

*** कार्यालयीन आदेश ***

संदर्भ: 1) मा.म.न.पा. ठराव क्रं.193 दि.20-10-2005.
2) मा.म.न.पा. ठराव क्रं.32 दि.20-06-2009.
3) जा.क्र.एसीटी-9/197 दिनांक 19-05-2006 चे कार्यालयीन आदेश .
4) मा. प्रशासक ठराव क्रं.69 दि.15-07-2022.

सोलापूर महानगरपालिकेकडील शहर व हद्दवाढ विभागातील मिळकतीना कर आकारणी करणेकरीता उपरोक्त संदर्भ क्रं. 1 व 2 अन्वये खालीलप्रमाणे दर ठरवून दिलेले आहेत. त्यानुसार उपरोक्त संदर्भ क्रं.3 च्या आदेशान्वये आजला नवीन मिळकतीची आकारणी करतानाखालील नमूद तक्त्यामधील दरानुसार व सवलती नुसार करण्यात येते.

| अ.क्र | तपशील | शहररविभाग दर (प्रतीचौ.फुट) | हद्दवाढ विभाग दर (प्रती चौ.फुट) |
|---|---|---|---|
| 1 | ओनरशिप फ्लॅट,दुकाने,घर,रो.हाऊस | 300/- | 210/- |
| 2 | आर.सी.सी.फ्रेम स्ट्रक्चर बांधकाम | 300/- | 200/- |
| 3 | आर.सी.सी.लोड बेअरींग | 275/- | 170/- |
| 4 | विटासिमेंट,धाबा,कॉलम बांधकाम | 175/- | 125/- |
| 5 | विटासिमेंट पत्रे,पत्राशेड | 105/- | 90/- |
| 6 | संपूर्ण पत्राशेड | - | 75/- |
| 7 | झोपडी | - | 60/-प्रति200चौ.फुट |
| 8 | भाडेकरी जागा वापरात असतील तर करपात्र मुल्यामध्ये | 10% वाढ | 10% वाढ |
| 9 | भिंतीखालीललक्षेत्र | 10% वाढ | 10% वाढ |
| 10 | बांधकाम खर्चासाठीचे सवलत दर | | |
| | अ-तळमजला | पूर्ण दर | पूर्ण दर |
| | ब-पहिलामजला | 10% सवलत | 10% सवलत |
| | क-दुसरामजलाव त्यावरील मजले | 20% सवलत | 20% सवलत |
| | ड-विनावापर क्षेत्र- | 50% सवलत | 50% सवलत |
| | पॅसेज,जिना,संडास,बाथरुम,गॅलरी,पार्कीग रो-हाऊस,अर्पामेंटट मधील वापर क्षेत्र. | 50% सवलत | सवलत नाही |

उपरोक्त संदर्भ क्रं.4 चे प्रशासक यांच्या ठरावानुसार सन 2005-09 या कालावधीकरीता करपात्र मुल्य ठरविण्याकरीता बांधकामाचे खर्च दर वरीलप्रमाणे निश्चित केलेल्या दरामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नसुन त्याच दरानुसार बांधकामाची करनिर्धारण व मुल्यनिर्धारण आकारणी करणेची कार्यवाही मालमत्ता कर विभागाने करावी.

उपरोक्त संदर्भ क्रं.4 च्या प्रशासकीय ठरावानुसार खालीलप्रमाणे बदल करणेस मान्यता दिलेली आहे. तरी खालील नमुद प्रमाणे कार्यवाही मालमत्ता कर विभागाने ठेवावी.

१) म.न.पा.च्या क्षेत्रामधील मिळकतीचे करनिर्धारण व मूल्यनिर्धारण करतेवेळी बांधीव क्षेत्राचे मोजमापे घेऊन कर आकारणी करावी, याअगोदरच्या भिंतीखालील क्षेत्र 10 टक्के गृहीत धरण्यात येत होते त्याऐवजी 15 टक्के गृहीत धरुन **नवीन कर निर्धारणानुसार आकारणी करताना** कार्यवाही **करावी.**

२) वरील तक्त्यातील बांधकाम खर्चासाठीचे असणारे सवलतीचे दर अ.क्र.10 मधील वरील संदर्भिय क्रं. 4च्या प्रशासकीय ठरावा नुसार रद्द करण्यात आले आहेत. म्हणजेच **मिळकतीचे करनिर्धारण व मूल्यनिर्धारण करताना** कोणत्याही प्रकारची मूल्यनिर्धारणाच्या वेळेची सवलत **यापुढे अनुज्ञेय** राहणार **नाही.** करनिर्धारण करतेवेळी संपूर्ण बांधीव क्षेत्राचे करनिर्धारण करावे.

३) बांधकामाची आकारणी करीत असताना मा.शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयास बाधा येणार नाही याची दक्षता घेवून कर आकारणीची कार्यवाही ठेवण्यात यावी.

सदर आदेशाची अंमलबजावणी वरीलप्रमाणे नमूद केले नुसार करण्यात यावी.

**मा.आयुक्त यांचे आदेशानुसार**

24/8/22

उपायुक्त (मालमत्ता कर)

**सोलापूर महानगरपालिका.**

**प्रत-**

**1.उपायुक्त (मालमत्ता कर) विभाग.**

**2. मुख्यलेखापरिक्षक.**

**3. सहा.आयुक्त (मालमत्ता कर) विभाग**

**प्रति-**

**1.अति.मालमत्ता कर अधिकारी**

**2.सहा.मालमत्ता कर अधिकारी**

**3. सर्व कर निरीक्षक / वसुली सेवक**

सोलापूर महानगरपालिका.

जा.क्र.-विकाअ/हवा/ ९२०
शहर हद्दवाढ कार्यालय,
सोलापूर. दि.२७/०३/२०१८

-: कार्यालयीन आदेश :-

सोलापूर महानगरपालिका हद्दीतील ज्या मिळकतदारांने नोटराईज/ अनोंदणीकृत दस्ताद्वारे जागेची खरेदी केलेली आहे व अशा मिळकतदार महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाकडे तसेच शहर हद्दवाढ विभागाकडे मिळकतीची नोंद करण्यासाठी येतात, अशा मिळकतदारांची नोंद घेते वेळी खालील तक्त्यात नमूद केलेल्या बाबींची पुर्तता केल्यानंतर भोगवटादार म्हणून नांव दाखल करण्याची कार्यवाही दि.०२/०४/२०१८, पासून करण्यात यावी.

१) म.न.पा.च्या असेसमेंट रजिस्टरला ज्या मिळकतदाराचे नांव सध्या आहे ते नांव आहे तसेच ठेऊन ज्या मिळकतदाराने नोटराईज/ अनोंदणीकृत दस्ताद्वारे नांव दाखल करावयास येतात त्यांचेकडून भोगवटाधारक नांव नोंदणी करण्यासाठी भोगवटाधारक नांव नोंदणी फी मिळकतीचे शासकीय शिघ्रसिध्द गणकाप्रमाणे अथवा दाखल केलेल्या दस्तऐवजातील किंमत यापैकी जी रक्कम जास्त आहे त्यावर १ टक्का प्रमाणे रक्कम स्विकारण्यात यावी.

२) भोगवटाधारक म्हणून नांव दाखल करताना मिळकतदाराने दाखल केलेल्या दस्तऐवजानुसार तसेच स्वत: साक्षांकीत व संपर्क क्रमांक नमुद करुन सोबतच्या नमुन्यानुसार अर्ज घेऊन त्यासोबत आधार कार्ड, पॅन कार्ड, मतदान ओळख पत्र, लाईट बिल अशा पुराव्याची मागणी करुन त्याआधारे मिळकतीवर प्रत्यक्षात जाऊन सदर मिळकतीवर संबंधित मिळकतदारांचा कब्जा आहे याबाबतची खात्री करुनच व त्याअनुषंगाने हमीपत्र स्विकारुन सदर मिळकतीची आकारणी कर आकारणी व कर संकलन कार्यालय तसेच शहर हद्दवाढ विभागासाठी ठरलेल्या दरानुसार करुन भोगवटदार म्हणून नांव नोंद करण्याची कार्यवाही ठेवावी.

३) नोटराईज/ अनोंदणीकृत दस्त घेऊन नांव नोंदणीसाठी मिळकतदार आल्यास व अशा मिळकतीची नोंद महानगरपालिकेमध्ये यापूर्वी झालेली नसल्यास अशा मिळकतदाराकडून सदर मिळकतीच्या मुळ मालकाचा जागेचा उतारा / मालमत्ता पत्रक व ६ ड चा उतारा प्राप्त झाल्यानंतरच अ.क्र.-१ मध्ये नमुद केल्यानुसार भोगवटाधारक नांव नोंदणी फी स्विकारुन मुळ मालकाचे नांव ठेवून भोगवटादार म्हणून नांव नोंद करण्यात यावी, व केलेल्या नांवाच्या नोंदी ज्या पध्दतीने फेरफार नोंदी घेण्यात येतात त्यानुसार स्वतंत्र रजिष्टर ठेवून अशा नोंदी घेण्याची कार्यवाही ठेवावी.

४) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीप्रमाणे महानगरपालिका ही नोटराईज/ अनोंदणीकृत दस्ताच्या आधारे फक्त मिळकतीच्या कराच्या वसुलीसाठी भोगवटाधार म्हणून नांव नोंद करणार असल्याने या संदर्भात जर मे. न्यायालयात जागेच्या मालकी हक्काबाबत अथवा जागेच्या कब्जाबाबत कायदेशीर बाबी उद्भवल्यास याबाबत महानगरपालिका जबाबदार राहणार नाही व याबाबत कोणतीही तोशीष महापालिकेस लागू होणार नाही. कारण, जागेची मालकी हक्क ठरविण्याचा अधिकार हा महानगरपालिकेचा नाही. त्यामुळे जागेच्या मालकी हक्काबाबत संबंधित मिळकतदार (मुळ मालक व भोगवटाधारक) भारतीय नोदंणी १९०८ च्या कलमा अंतर्गत दुय्यम निबंधक कार्यालयात दस्ताची नोंदणी करुन दस्तऐवज सादर केल्याशिवाय मालकी हक्क सांगणार नाही. अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र संबधित अर्जदारांकडून घेतल्यानंतरच भोगवटाधारक म्हणून नांव नोंद करण्याबाबतची कार्यवाही ठेवावी.

..

५) महानगरपालिकेच्या हद्दीत ज्या जागेचा ले-आऊट महानगरपालिकेने मंजूर केलेला आहे व अशा जागेचे अकृषीक (N.A.) झालेले आहे. अशा जागेची नोंद नोटराईज/ अनोंदणीकृत दस्ताद्वारे करण्यात येऊ नये. याची संबंधित सेवकांनी दक्षता घ्यावी अन्यथा होणाऱ्या परिणामास संबंधित सेवक जबाबदार राहील.

६) एका मिळकतीचे एका पेक्षा जास्त नोटराईज/ अनोंदणीकृत दस्त (जॉगिग) झालेले असल्यास अशा भोगवटाधारकाकडून भोगवटाधारक नांव नोंदणी फी वसुलीची कार्यवाही करताना जॉगिग झालेल्या सर्व नोटराईज/ अनोंदणीकृत दस्ताच्या किंमतीनुसार अनुक्रमांक १ नुसार भोगवटादार फी स्विकारण्यात यावी. त्यानंतरच भोगवटादार म्हणून नांव नोंद करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

७) यापूर्वी नोटराईज कायदेशीर मार्गाने हस्तांतर झालेल्या मनपा हद्दीतील मिळकतीवर घर/ दुकान बांधकाम झालेली आहेत. त्यासाठी कोणताही बांधकाम परवाना देण्यात आलेला नाही. मूळ मालक जागेवर अस्तित्वात नसून, इतर भोगवटा करत आहेत. मात्र या ठिकाणी म.न.पा.स मिळकत कर प्राप्त होत नसल्याने मोठे आर्थिक नुकसान होत असल्याने, अशा मिळकतीवर मनपा कर वसूल आवश्यक असल्याने कराची आकारणी करावी.

भारतीय नोदणी अधिनियम १९०८ व मुंबई मुद्रांक शुल्क कायदा -१९५८ मधील तरतूदी प्रमाणे करावयाची कार्यवाही ही स्वतंत्र बाब आहे. त्यामुळे मालकी हक्काबाबत कायदेशीर तरतुदीप्रमाणे मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कार्यवाही होईल. तथापि, म.न.पा. कडील प्राप्त झालेल्या अशा अर्जाबाबतची सर्व उपलब्ध दस्ताऐवजांच्या छायांकित प्रती मा.जिल्हाधिकारी कार्यालयास दर आठवडयाच्या पहिल्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी उपलब्ध करुन देण्यात यावे, या मध्ये कसुर होता कामा नये.

८) भोगवटादार नांव म्हणून नांव नोंद केल्यास मिळकतीच्या मालकी हक्काचा व हस्तांतरणाच्या कायदेशीर बाबींचा कोणताही संबंध येणार नाही. भोगवटादार म्हणून मिळकत कर भरल्यामुळे सदर जागेतील विद्यमान बांधकाम नियमीत झाले असे गृहीत धरता येणार नाही. भोगवटादार म्हणून नोंद केलेल्या मिळकतीच्या मालकी हक्काबाबत मे.न्यायालयात दावा दाखल झाल्यास याबाबत कोणतीही तोशीष महानगरपालिकेस लागू महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. तसेच याबाबत कोणतीही तोशीष महानगरपालिकेस लागू होणार नाही. याबाबतची माहिती संबंधित अर्जदार / भोगवटादारास देण्यात यावी.

९) कर आकारणी प्रयोजनार्थ भोगवटादार म्हणून नोंद फक्त मालमत्ता कर वसुलीसाठी मर्यादित आहे. याची नोंद घ्यावी.

१०) या पुढे नोटराईज/ अनोंदणीकृत दस्त घेऊन नांव नोंदणीसाठी आलेल्या मिळकतदारांची मिळकतीची नोंद नव्याने स्वतंत्र असेसमेंट रजिष्टर तयार करुन त्यामध्ये नोंद घेण्याची कार्यवाही ठेवावी.

आयुक्त,
(सोलापूर महानगरपालिका, सोलापूर)

प्रत :-

- कर आकारणी व कर संकलन विभाग
- शहर हद्दवाढ विभाग
- संबंधित रिव्हीजन इन्स्पेक्टर, दोन्ही विभाग

प्रत :-

- मा. उपआयुक्त तथा, नियंत्रण अधिकारी.

# मा. प्रशासकीय प्रस्ताव

सोलापूर महानगपालिकेच्या मामुली /~~तहकुब~~/~~विशेष~~
सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.८० ठराव क्र.१००
दि.२०/०७/२०२१ रोजी ठेवता खालील प्रमाणे
ठराव बहुमताने/~~सर्वानुमताने~~ पारित झाला.

८०

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १४०-ब परिस्थितिकीयदृष्टया लामदायक योजनेची अंमलबजावणी करण्याकरीता मालमत्ता करातून सूट किंवा परतावा या अधिनियमातील तरतुदीनुसार सोलापूर महानगरपालिका मिळकरतदारांना खालील प्रमाणे मालमत्ता करातून सूट देणेबाबत प्रस्तावित करणेत येत आहे.

१. पावसाचे पाणी फिल्टर करुन कुपनलिकेत सोडणा-या ( Rain Water Harvesting) मिळकतकरधारकांसाठी मिळकत करामध्ये २% सुट,

२. पावसाचे पाणी संपामध्ये साठवणे व त्याचा पुनर्वापर करणे ( Rain Water Storage ) मिळकतकरधारकांसाठी मिळकत करामध्ये ३% सुट,

३. उर्जाबचतीसाठी सौरउर्जाचा वापर करणा-या मिळकतकरधारकांसाठी मिळकत करामध्ये ५% सुट,

वरील प्रमाणे मिळकतकरात सवलत देणेस धोरणात्मक निर्णय होणेकामी मा.आयुक्त यांचे दि.१३.०७.२०२१ रोजीच्या मान्यतेने आलेल्या प्रकरणास मान्यता देण्यात येत आहे.

तथापि सोसायटीने सामुहिकरित्या ही योजना अंमलात आणली असल्यास संपूर्ण सोसायटीस सवलत देण्यास ही सभा मान्यता देण्यात येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिका नगर सचिव कार्यालय

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील तरतुदी आणि महापालिकेच्या हिताच्या ठरावाची अंमलबजावणीची पुढील कार्यवाही करावी.

आयुक्त
सोलापूर महानगरपालिका

GAD ९४८
दि. 23/08/21

दि. ३०।८।१९८ ....रोजी ठेवता खालील प्रा. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

मा. केंद्र शासनाच्या आवास व शहरी कामकाज मंत्रालय, भारत सरकार यांचे दि. २९-६-२०१८ च्या पत्रामध्ये मा. पंतप्रधान, भारत सरकार यांनी दिलेल्या सूचनानुसार दि. १-७-२०१८ पासून भारतातील सर्व स्मार्ट शहरामध्ये देयकांचे संकलन तथा अदा होणा-या देयकांचे डिजीटायझेशन करणेकामी मा. महाराष्ट्र शासनाने क्र. शिकाना स्मार्ट सि. २०१८/प्र.क्र.०८/नवि-३३, दि. ९-७-२०१८ च्या पत्रानुसार १०० दिवसाचा कार्यक्रम हाती घेतलेला आहे. त्यानुसार आवश्यक त्या सूचना पत्रामध्ये दिलेल्या आहेत.

सोलापूर महानगरपालिका अंतर्गत कर आकारणी कर संकलन कार्यालय व शहर हद्दवाढ विभागाकडे मिळकत कराची वसुली हस्तलिखीत पावत्या हया बंद करण्यात आलेल्या असल्यामुळे कोणत्याही वसुली सेवकांकडून रक्कम रोखीने स्विकारण्यात येत नाही. त्यामुळे आनलाईन व नागरी सुविधा केंद्रकाकडील संगणकाद्वारे आजला मिळकत कराची रक्कम, हस्तांतरण फी, वारस नोंद फी, नवीन नोंदणी फी ही स्विकारण्यांत येते. शासनाच्या निर्देशानुसार शुल्क डिजिटल ट्रान्झक्शन अंतर्गत RTGS, NEFT, Credit Card, Debit Card व P.P.I. ऑनलाईनद्वारे रक्कम थेट महानगरपालिकेच्या खात्यावर जमा होणार असल्याने त्याप्रमाणे कार्यवाही चालू करण्यात आलेली आहे.

सन २०१८/२०१९ च्या आर्थिक बिलावर मिळकतदारांना दि. ३१-८-२०१८ अखेर महानगरपालिकेच्या मालमत्ता करावर ५% ची सवलत दिली जात आहे. ऑनलाईन ट्रान्झक्शनद्वारे शुल्क स्विकारल्यास कामाचा निपटाराही जलदगतीने होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे डिजिटल ट्रान्झक्शन माध्यमातून रक्कम जास्तीत जास्त ऑनलाईन भरण्यासाठी प्रोत्साहित करणे आवश्यक असल्याने मिळकतदारांना कॅशलेस व्यवहार करण्यास प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने ज्या मालमत्ताधारकांनी डिजीटल पेमेंट ऑनलाईन ट्रान्झक्शनद्वारे करतील अशा मालमत्ताधारकांना महानगरपालिकेच्या मालमत्ता करामध्ये अतिरिक्त १% ची सवलत माहे ३१-१०-२०१८ अखेर देणेबाबत धोरणात्मक निर्णय होणे जरुरीचे असल्याने यांस मा. स्थायी समिती व मा महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे. तथापी आजला मा. स्थायी समितीचे कामकाज बंद असल्याने सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नियम ३५-अ नुसार मा. महानगरपालिकेकडे मान्यता मिळणेकामी मा. महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २५-७-१८ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

(*) हस्तलिखीत पावत्याद्वारेही वसुली करण्यांत यावी. झोनवाईज यंत्रणा कार्यान्वीत करणे यावी. याबाबत डिजीटलायझेशनचे संदर्भात मोठया प्रमाणात जनजागृती करणेत यावी. यास मान्यता देणेत येत आहे.

Tax
8

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949
मधील तरतुदी आणि महापालिकेच्या हितास्तव
ठरावाची अंमलबजावणीची पुढील
कार्यवाही करावी.

आयुक्त
सोलापूर महानगरपालिका

| |
|---|
| Mainet- |
| GAD- 910 |
| दिनांक- ६।९।१८ |

# सोलापूर महानगरपालिका
## प्रशासक ठराव
### विषय क्र.३९ ठराव क्र.३९ दिनांक. ०३/०६/२०२२
### (मा.सर्वसाधारण सभा संदर्भ )

३९

सोलापूर महानगरपालिका मालमत्ता कर विभागामार्फत दरवर्षी मिळकत दारांना घरपोच मिळकत कराची बिले मनपा कर्मचाऱ्यांमार्फत वाटप करण्यात येतात. प्रस्तावात नमूद प्रमाणे सदरची बिले हि छपाई करून वाटप करण्यासाठी साधारणतः २ ते ३ महिन्याचा कालावधी लागतो. शासनाने डिजिटल इंडिया अंतर्गत सर्व सेवांचे संगणकीकरण करण्याच्या सुचना दिलेल्या असून त्या अनुषंगाने e-bill e-mail द्वारे दिल्यास Go green उपक्रमात चालणा मिळू शकते मालमत्ता कर विभागामार्फत वार्षिक छपाई बिला ऐवजी मिळकत दार यानी e-bill ची मागणी केल्यास e-bill उपलब्ध करून दिल्यास मिळकत करात रु.१००/- सवलत देणेस प्रस्तावित करण्यात आले असता, मा.आयुक्त यांनी (it is necessary in the view of environment as well as it will save time for distribution as well as collection. Send to committee) असे आदेश पारित केले आहे. यानुसार प्रकरणी मा.सर्वसाधारण सभेची धोरणात्मक मान्यता आवश्यक आहे परंतू सध्या मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने मा.प्रशासक यांची नेमणूक झाल्याने मा.प्रशासक यांच्या निर्णयास्तव पाठविणे कामी दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीकडे पाठविणेस मा.आयुक्त यांचे दि.३०/०५/२०२२ च्या आदेशानुसार उपसमितीकडे मा.प्रशासक यांचे मान्यतेस्तव आलेले प्रकरणास प्रस्तावित प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

(प्रविण प्रे.दंतकाळे)
नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

(सोलापूर महानगरपालिका — मा.प्रशासक कार्यालय)

(पि.शिवशंकर, भा.प्र.से.)
प्रशासक
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिका

प्रशासक ठराव

(मा.स्थायी समिती संदर्भ)

विषय क्र.१६६ ठराव क्र.१६६ दिनांक ०३/१०/२०२४



विकसन करारानुसार विकसकांची असेसमेंट सदरी नोंद घेणे करीता नोंदणी फी निश्चित करणे बाबत मा.उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील रिट याचिका क्र.१०१५२/२०२४ CREDAI सोलापूर वि. सोलापूर महानगरपालिका व इतर या दाव्यामध्ये स्थायी समिती ठराव क्र.२४ दि.२०/०५/२००९ व मनपा ठराव क्र.२४४ दि.२५/०२/२००९ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अंतर्गत अनुसूची ड प्रकरण ८ नियम १ नुसार शिर्षक / बदलाचे हस्तांतरण सुचित करण्यासाठी व्यवहार मुल्याच्या १% शुल्क आकारत आहे या करण्यात येणाऱ्या आकारणीच्या विरुध्द रिट याचिका क्र. १०१५२/२०२४ दाखल झालेला आहे. यामध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.२०/०७/२०२४ रोजी आदेश पारित केला असून सदर आदेशामध्ये याचिकाकर्ते यांनी दि.२०/०२/२०२४ रोजी दिलेल्या निविदेनावरील निर्णय घेणेकामी दि.२४/०७/२०२४ पासून ३ महिन्याच्या आत निर्णय घेणेकामी निर्देश दिलेले आहेत. याबाबत दि.२१/०८/२०२४ रोजी CREDAI सोलापूर असोसिएशनचे प्रतिनिधी यांचेसमवेत उपायुक्त (कर) सोलापूर महानगरपालिका यांचे दालनात बैठक घेण्यात आली. विकसन कराराच्या नोंदी करीता सध्या आकारण्यात येणाऱ्या विकसन करारात नमूद रकमेच्या अथवा ज्या जमिनीचा विकास करावयाचा आहे त्या जमिनीच्या Ready Recknor नुसार होणारे मुल्यांकन यापैकी जी रक्कम अधिक असेल अशा रकमेच्या १% हस्तांतरण शुल्क ऐवजी विकसन करारात नमूद रकमेच्या किंवा जर अशी रक्कम नमूद नसेल तर विकास करावाच्या जमिनीच्या Ready Recknor Value च्या ०.२% इतके किंवा र.रु.२०,०००/- प्रति १ कोटी याप्रमाणे विकसन करार नोंदणी शुल्क आकारणे कामी मा.स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे परंतू मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे निर्णयास्तव पाठविणे कामी मा.आयुक्त यांचे दि.०३/१०/२०२४ च्या मान्यतेने आलेले प्रकरणी प्रस्तावित प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

(प्रविण प्र.दंतकाळे)
नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

(शीतल तेली - उगले, भा.प्र.से.)
प्रशासक
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिका
मा.प्रशासक कार्यालय

# सोलापूर महानगरपालिका
## प्रशासक ठराव
## (मा.स्थायी समिती संदर्भ)
## विषय क्र.२११ ठराव क्र.२११ दिनांक २०/०२/२०२५

२११

सोलापूर महानगरपालिका क्षेत्रामध्ये भाडेकरारनामा व्यतिरिक्त इतर मालमत्तांना मा.महासभेने निश्चित करून दिलेल्या दरानुसार कर आकारणी करण्यात येते. तसेच प्रत्यक्ष भाडेकरारनामानुसार देण्यात आलेल्या मालमत्तांना प्रत्यक्ष प्राप्त भाड्यानुसार कर आकारणी करण्यात येत आहे. त्यामुळे एकाच क्षेत्रफळाच्या मालमत्तांच्या कर आकारणीमध्ये खुप तफावत दिसून येते. यामुळे नागरीकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. भाडेकरारनामानुसार कर आकारणी केल्यास मालमत्ता धारकास भाड्यापासून मिळणारे उत्पन्नातुन महानगरपालिका व इतर कराचा भरणा करावा लागत असल्याने मालमत्ताधारकास स्वतःच्या मालमत्तेवर नगण्य उत्पन्न मिळत असल्याचे तक्रारीत वाढ होत आहे. परिणामी शहरातील उद्योगधंद्यावर परिणाम होऊन व्यवसायिक इतर ठिकाणी स्थलांतरीत होण्याच्या प्रमाणात खुप मोठी वाढ झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे त्यावर अवलंबित असलेले छोटे धंदे बंद होत आहेत. यामध्ये पळवाट निर्माण करण्याकरीता जागा मालक करारनामा बनविताना दोन वेगवेगळे करारनामा करून स्वतःचा फायदा पाहत आहेत. यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान होत आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ८ कराधन नियम ७ नुसार करयोग्य मुल्य ठरविण्यासाठी वाजवी भाड्यावर कर आकारणी करण्याची तरतुद करण्यात आली आहे.

सोलापूर महानगरपालिका हद्दीत बँका, मॉल, शॉपिंग, दवाखाने, टॉवर, कॉर्पोरेट कंपनी यांचेकडून भाडेमालकाशी करार करून जागेचा वापर करतात असे करताना अश्या कंपन्याकडून भाडेमालकाबरोबर रजिस्टर्ड करारपत्र करून घेण्यात येते. अशी करारपत्रे उपलब्ध करून घेऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे अनुसुची ड प्रकरण ८ नियम ८ (१) नुसार नोटीस देऊन ८ (२) नुसार त्यांचेकडून मिळकतीचे मोजमाप व आवश्यकते कागदपत्रे घेऊन तपासणी निवेदन तयार करण्यात येते. सदर मिळकतीचे वार्षिक भाडे / करपात्र मुल्य निश्चित करून सदर नियमातील १५ (२) नुसार संबंधीत मिळकतदारास स्पेशल नोटीस बजावून २१ दिवसाची हरकतीसाठी मुदत दिली जाते. २१ दिवसात हरकत किंवा कोणतेही तक्रार प्राप्त न झाल्यास स्पेशल नोटीसीत दर्शविल्या प्रमाणे वार्षिक भाडे / करपात्र मुल्यावर आकारणीचे बिल मिळकतदारास दिली जाते.

वर नमूद प्रमाणे जर भाडेकरार करून घेतला नसेल तर अशा मिळकतदारावर भाडेकरी म्हणून सदर मिळकतीवर होणाऱ्या वार्षिक भाडे / करपात्र मुल्यावर १०% समाविष्ट करून आकारणी केली जाते.

भाडे करार रजिस्टर्ड केला असल्यास व भाडेकराराप्रमाणे जागा मालक मनपा टॅक्स भरीत असल्यास त्यास असणारे मासिक भाडे x १२ येणारे वार्षिक भाडे / करपात्र मुल्यावर रेटेबल व्हॅल्युनुसार निश्चित केलेल्या दरानुसार कराची आकारणी करण्यात येते.

भाडेपट्टा कराराप्रमाणे भाडेकरी मनपा टॅक्स भरीत असल्यास त्यास असणारे मासिक भाडे x १२ येणारे वार्षिक भाडे / करपात्र मुल्यावर रेटेबल व्हॅल्युनुसार निश्चित केलेल्या दरानुसार कराची आकारणी मधील महाराष्ट्र शिक्षण कर व रोजगार हमी योजना इत्यादी कर सोडून सर्वसाधारण कर, सफाई पट्टी व इतर कर वार्षिक भाडे / करपात्र मुल्यामध्ये समाविष्ट करून त्यानुसार वार्षिक भाडे व करपात्र मुल्य निश्चित करण्यात येऊन रेंट + टॅक्स (सुपर टॅक्स) नुसार कराची आकारणी करण्यात येते.

भाडे करारानुसार जागा मालक असो अथवा भाडेकरी असो जे कोणी मिळकत कर भरतील त्यांना एकच मिळकत कर त्यांच्या भाडेकरारातील दरानुसार केल्यास शहर हद्दीत व्यवसायिक मिळकती संख्या वाढ होऊन महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे जागा मालक अथवा भाडेकरी

मालमत्ता कर कार्यालय
आवक क्र. ८५१३
दि. २१ / ०२ /२०२५

कोणीही कर भरला तर सुपर टॅक्स न लावता करारातील भाड्याच्या किंमतीनुसार आकारणीची कार्यवाही केल्यास तक्रार होणार नाही.

सध्याची प्रचलित कार्यपध्दती लागू करताना श्री.डी.बी अंगडी लिखीत सिव्हिल प्रॉपर्टी बुकामध्ये असलेले २९ (सी) च्या आधारानुसार आकारणीची कार्यवाही सोलापूर महानगरपालिकेमध्ये करण्यात येते याबाबत मा.स्थायी समिती अथवा मा.सर्वसाधारण सभेने कोणताही ठराव पारित करून धोरण निश्चित केले नाही. मा.मुख्यमंत्री यांच्या ७ कलमी कार्यक्रमातंर्गत गुंतवणूकीस प्रोत्साहन देण्यासाठी म्हणून व्यवसायिक प्रयोजनार्थ भाड्याने दिल्या जाणाऱ्या मिळकतीना कर आकारणी करताना आकारण्यात येणाऱ्या सुपर टॅक्स आकारणी बाबत दि.०१/०४/२०२५ पूर्वी पूनर्विचार होणे आवश्यक आहे. यास्तव मा.स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे व सदर बाब ही धोरणात्मक असल्याने मा.सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे परंतु मा.स्थायी समिती व मा.सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने व मा.प्रशासक यांची नियुक्ती झाल्याने दि.११/०३/२०२२ ने गठीत झालेल्या उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे निर्णयास्तव पाठविणे कामी मा.आयुक्त यांचे दि.१८/०२/२०२५ ने आलेले **प्रकरणी सुपरटॅक्स लावणे संदर्भात** सोलापूर महानगरपालिकेच्या **मा.स्थायी समिती, मा.सर्वसाधारण सभेची कोठेही मान्यता घेतल्याचे दिसून येत नाही. शहरात गुंतवणूकीसाठी येणाऱ्या गुंतवणूकदार, उद्योजकांना प्रोत्साहन मिळावे व पोषक वातावरण निर्माण व्हावे आणि शहरामध्ये गुंतवणूक वाढावी याकरीता सोलापूर महानगरपालिकेमध्ये प्रचलित असलेला “सुपरटॅक्स” हा रद्द करणे आवश्यक असलेने, सदर “सुपरटॅक्स” रद्द करण्यास मान्यता देण्यात येत आहे तसेच दि.०१/०४/२०२५ पासून कोणत्याही प्रकारच्या मिळकतीस “सुपरटॅक्स” लावण्यात येणार नाही. यापुर्वी ज्या मिळकतींना “सुपरटॅक्स” लावणेत आलेला आहे तो दि.०१/०४/२०२५ पासून कमी करून केवळ अधिनियमातील तरतूदीनुसार व मा.मनपाने ठरवून दिलेल्या व्यावसायिक दराने आकारणी करणेसही मान्यता देण्यात येत आहे व सदरची बाब धोरणात्मक असल्याने मा.सर्वसाधारण सभेकडे धोरणात्मक निर्णयास्तव पाठविणेकामी शिफारस करण्यात येत आहे.**

(प्रविण प्रे.दंतकाळे)
नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिका मा.प्रशासक कार्यालय

(शीतल तेली - उगले, भा.प्र.से.)
प्रशासक
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिका
प्रशासक ठराव
विषय क्र.६९ ठराव क्र.६९ दिनांक. १५/०७/२०२२
(मा.सर्वसाधारण सभा संदर्भ )

६९

महानगरपालिका हद्दीत अस्तित्वात असलेल्या वेगवेगळ्या प्रकारच्या इमारतीचे मालमत्ताचे करयोग्य मुल्य ठरविताना इमारतीचे बांधीव क्षेत्र (Built up Area) व चटई क्षेत्र (Carpet Area) सर्वसाधारणपणे भिंतीखालील क्षेत्र १० टक्के ऐवजी १५ टक्के करणेस तसेच शहर विभाग व हद्दवाढ विभागातील बांधकाम खर्चासाठी सवलतीचे दर रद्द करणेस प्रस्तावित प्रमाणे सदरची बाब धोरणात्मक असल्याने मा.महानगरपालिकेची धोरणात्मक मान्यता मिळणेकामी मा.उपसमितीमार्फत मा.प्रशासक यांचेकडे प्रस्तावित प्रमाणे धोरणात्मक मान्यतेस्तव सादर करणेस मा.आयुक्त यांचे दि.१४/०७/२०२२ च्या मान्यतेने आलेले प्रकरणास धोरणात्मक मान्यता देणेत येत आहे.

(प्रविण प्रे.दंतकाळे)
नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिका ★ मा.प्रशासक कार्यालय ★

(पि.शिवशंकर, भा.प्र.से.)
प्रशासक
सोलापूर महानगरपालिका

युजर चार्जेस - ठराव (६०)

सोलापूर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण/खास/विशेष
एवं साधारण सभेपुढे विषय क्र. ३0 ठ. क्र. 28
दि. 29/4/10 रोजी ठेवला असता खालील प्रमाणे ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला. 30

मा.महाराष्ट्र शासनाचे सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत सोलापूर शहरातील ड्रेनेज योजनेचा समावेश करणे बाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव मा.महाराष्ट्र शासनाची सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानाअंतर्गत सोलापूर शहरातील ड्रेनेज योजनेचा समावेश करणेकामी (१) सोलापूर शहरातील पाणी पुरवठा योजनेचे वॉटर ऑडिट व एनर्जी ऑडिट करुन घेण्यात आले असून त्यानुसार कार्यवाही करीत आहोत. (२) शहरातील सर्व नळ जोडण्यांना मिटरने पाणी पुरवठा करुन घेणेत येत आहे. (३) मा.महाराष्ट्र शासनाचे सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत असलेल्या सर्व अटी मान्य करीत आहोत. (४) मलनिस्सारण योजनेकरिता तात्काळ यूजर चार्जेस घेण्यास सुरुवात करीत आहोत व याकरिता बँकेत स्वतंत्र खाते उघडण्यात येईल. या खात्यामध्ये पाणी पुरवठा व मलनिस्सारण कर जमा करीत आहोत. या जमा रकमेतून नगरोत्थान योजने करिता काढलेल्या कर्जाचे हप्ते विहित वेळेत भरणे बाबत कार्यवाही ठेवणेत येत आहे.

या प्रमाणे मा.आयुक्त यांचे दि.१७-४-२०१० चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

Rates ठ.क्र.२०२ दि. ३१-३-२०१० प्रमाणे आकारण्यात यावेत.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

... विभाग
आवक क्र. - 293
दिनांक 28/5/2010

सोलापूर मह...

" UNDER RTI ACT "

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/प्रास्ताविक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज तात-३ ठ. क्र. ३०३ दि. २५/२/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

३५०

तात-३/३५०

सन २०१५-१६ सालच्या मिळकत कर आकारणी कामी दर निश्चित करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव यापूर्वी सादर करण्यांत आलेल्या विभागानुसार प्रारुप दरसूचीमध्ये सुचविलेल्या दरानुसार व कार्यपध्दतीप्रमाणे दर निश्चित व्हावे. अथवा नगर रचनाकार यांनी विभाग दर्शविणारे नकाशातील रस्त्याच्या बाजूला असणा-या मिळकतींना वेगळे दर व अंतर्गत भागात असणा-या मिळकतींना वेगळे दर लावून आकारणाची कार्यवाही ठेवणेकामी दर निश्चित करता येतील त्याचप्रमाणे १) सोलापूर महानगरपालिका हद्दीतील, शासकीय, निमशासकीय, दवाखाना या व्यतिरिक्त पेट्रोल पंप, सिनेमा थिएटर, नाटयगृह, मंगल कार्यालय, सांस्कृतिक, शैक्षणिक इमारत इत्यादी तत्सम इमारतीसाठी मुल्यांकन करणेकामी मूल्य दर निश्चित करणे. २) त्याचप्रमाणे विनापरवाना बांधकामाची आकारणी निश्चित करणे ३) भाडे करारात भाडया व्यतिरिक्त टॅक्स भरण्याबाबतही करार झालेला असल्यास त्याचे मुल्य दर निश्चित करणे ४) मिळकत हस्तांतर व मिळकतीच्या वापरातील बदलानंतर अशा मिळकतीचे मुल्य दर निश्चित करणे प्रस्तावात नमूद प्रमाणे जीआयएस प्रणालीद्वारे होणा-या सर्व्हेअंती मिळकत कर आकारणीचे दर निश्चित करणेची बाब असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नियम ९९ मधील तरतुदीनुसार नव्याने प्रस्तावित केलेले कराचे दर निश्चितीची कार्यवाही माहे २० फेब्रुवारी २०१६ पर्यंत होणे आवश्यक असलेने धोरण निश्चित होऊन निर्णय मिळणेकामी मा. आयुक्त यांचे १८-१-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

दर चार वर्षांनी मिळकत कर रिव्हीजन करणे आवश्यक होते. सन २००५ पासून आजलागायत मिळकत कर रिव्हीजन न करता संबंधित यंत्रणेने म.न.पा.चे आतोनात नुकसान केलेले आहे. सदर वित्तीय नुकसानीस केवळ कर आकारणी विभागाकडील यंत्रणाच जबाबदार असलेने संबंधिताकडून होणारी रक्कम वसूल करणेस मान्यता देणेत येत आहे. नोंद नसलेल्या मिळकतीचा शोध घेऊन कर आकरणी उत्पन्न वाढवावे. आणि रिव्हीजनचे काम तातडीने हाती घेऊन सुरु करणेत यावे. सध्याचे प्रचलित पध्दतीने व प्रचलित दरानुसार शहर व हद्दवाढ विभागाकडील कर आकारणी करणेस मान्यता देणेंत येत आहे. शहर व हद्दवाढ भागातील खुल्या जागेला म.न.पा. आकारीत असलेले टॅक्स अत्यंत जास्त आहे. त्यामुळे त्याच्यावर अन्याय होत आहे. सबब शहर व हद्दवाढ भागातील खुल्या जागेची कर आकारणी २ टक्के प्रमाणे करण्यांस मान्यता देण्यात येत आहे. २ टक्के पेक्षा अधिक टॅक्सची आकारणी करण्यांत येऊ नये. म.न.पा.ने ज्या अधिक टॅक्सची आकारणी करुन ज्या नोटीसा पाठविल्या आहेत त्या रद्द करुन २ टक्के प्रमाणे टॅक्सची आकारणी करुन नवीन नोटीसा पाठवून द्यावेत. तोपर्यंत कोणत्याही नागरिकाविरुध्द कसल्याही प्रकारची कार्यवाही करण्यांत येऊ नये. मा. आयुक्तांनी या ठरावाप्रमाणे खुल्या जागेची आकारणी २ टक्के प्रमाणे करावी, यांस ही सभा मान्यता देत आहे.

मा. आयुक्त यांनी शहर व हद्दवाढ भागातील जीआयएस सर्व्हे (मिळकतीचा शोध) घेणेची कार्यवाही ही जून २०१६ पर्यंत पूर्ण करुन घ्यावे. तसेच राहिलेले सर्व रिव्हीजनचे काम ज्यादा सेवकवर्ग नियुक्त करुन डिसेंबर २०१६ अखेर पूर्ण करावे. रिव्हीजन करताना शहर व हद्दवाढ एरियाचे विविध भाग करुन कार्यवाही जलदगतीने पूर्ण करावे यांस ही सभा मान्यता देत आहे.

(3)

कर आकारणी

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 ... मधील तरतुदी ... 2.16

कार्यवाही ...

आयुक्त

सोलापूर महानगरपालिका

सामान्य प्रशासन विभाग
आवक क्र. 9050
दि. २०/2/२०१६

नगरसचिव

सोलापूर महानगरपालिका

कर आकारणी व कर संकलन कार्यालय
आवक क्रमांक- ८७३६
दि. २२-०२/२०१६

59961/2021/SMC-PROPERTY TAX

सोलापूर महानगरपालिका

जा.क्र.ए सी टी/९/१९८
कर आकारणी व कर आकारणी प्रमुख
यांचे कार्यालय
सोलापूर
दिनांक १८/०७/२००६

संदर्भ :- मा.म.न.पा.ठराव क्र.११३ दि.२०-१०-२००५

-: कार्यालयीन आदेश :-

मु.प्रा.महा.अधिनियम १९४९ चे शेडयूल चॅप्टर ८ (२१) अंतर्गत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

सन २००५-२००९ या वर्षाकरिता करपात्र मुल्य ठरविण्यासाठी सुधारित बांधकाम खर्चाचे दर खालीलप्रमाणे निश्चित करणेत येत आहेत.

| अ.नं. | बाबी | निश्चित केलेले दर (प्रति चौरस फूट बांधकाम खर्च) |
|---|---|---|
| १ | ओनरशिप फ्लॅट, दुकाने, घरे, रो.हाऊस | रु. ३०० |
| २ | आर.सी.सी.फ्रेम स्ट्रक्चर बांधकाम | रु. ३०० |
| ३ | आर.सी.सी.लोड बेअरिंग | रु.२७५ |
| ४ | विट, सिमेंट, धाबा, कौलारु बांधकाम | रु. १७५ |
| ५ | विट, सिमेंट पत्रे, पत्राशेड | रु. १०५ |
| ६ | भाडेकरी जागा वापरत असतील तर करपात्र मूल्यामध्ये | १० % वाढ |

तसेच सर्व प्रकारच्या बांधकामांना बांधकाम क्षेत्र धरताना चटई क्षेत्राच्या १० % वाढ.

वर नमूद बाब क्र.२ ते ५ चे बांधकाम खर्चाचे दर हे तळमजल्यासाठीचे.

पहिल्या मजल्याच्या बांधकाम खर्चासाठी वरील प्रस्तावित दरात १० % सूट दुसरा मजला व त्यावरील बांधकामासाठी २० % सूट.

स्टेअर व पार्किंगसाठी वरील बांधकाम दरात ५० % सूट.

जिना, गॅलरी, संडास, बाथरुम, पॅसेज यावर आकारणी दराच्या ५० % सूट

प्रत्यक्ष भाडे करार उपलब्ध झाल्यास त्यानुसार नियमाप्रमाणे कार्यवाही करणे.

(सही) १८/७/०६

आयुक्त,
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ...... सूचक/अनुमोदक/विरोध
सर्व साधारण सभा ...... ६५ ठ. क्र. ३२
दि. २०।६।०५ रोजी झालेल्या सभेत ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सध्या हद्दवाढीचे रिव्हीजनचे काम चालू आहे. शहरामध्ये रिव्हीजन करतेवेळी महानगरपालिकेने जो निर्णय घेतला आहे. त्याच पध्दतीने खाली नमूद प्रमाणे हद्दवाढीसाठी निर्णय घेणेस मान्यता देणेस येत आहे.

शहर हद्दवाढ

| | प्रति चौ.फूटास बांधकाम खर्च. रक्कम रुपये |
|---|---|
| रो हाऊस अपार्टमेंट | |
| आर सी सी फ्रेम स्ट्रक्चर | २१०/- |
| लोड बेअरिंग | २००/- |
| कौलारु धाबा | १७०/- |
| वीट,सिमेंट,माती, वर पत्रा | १२५/- |
| संपूर्ण पत्र शेड | ०९०/- |
| झोपडी | ०७५/- |
| | ०६०/- प्रति २०० चौ.फूट |

| | | | |
|---|---|---|---|
| आर सी सी बांधकाम क्षेत्र | १५% | भिंतीखालील गृहीत | १० % |
| इतर बांधकाम क्षेत्र | २०% | भिंतीखालील गृहीत | |
| संपूर्ण पत्रा शेड | ०० | | |

विना वापर क्षेत्र पॅसेज,जीना,संडास बाथरुम,गॅलरी ५०% सवलतीचे दर
तसेच पहिला मजला १०% सवलतीचे दर.
दुसरा मजला २०% सवलतीचे दर

भारतीय कारखाने अधिनियम १९४८ मधून विगर डाईगच्या मिळकती वगळण्यात येत आहे.

मागील रिव्हीजन (हद्दवाढ) च्या वेळेस जे कर्मचारी, अधिकारी होते,त्यांना हया रिव्हीजनच्या वेळी त्याचा समावेश करु नये.

मोजमापे जी आहेत. त्या प्रमाणे स्पेशल नोटीस दिली पाहिजे.अंदाजे मोजमापे देऊ नये. मोजमापे जी आहेत त्या प्रमाणे आकरणी करावी.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

२६।६।०५

ठरावाप्रमाणे ...... पुढील ...... कार्यवाहीसाठी.

४२८० २५।६।०८

२३५

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई-३२

Email ID : shankarjadhav@nic.in

---

क्रमांक : क्र. संकिर्ण-२०१६/प्र.क्र.५९/नवि-२० दिनांक :- १७ मार्च २०२१

प्रति,

आयुक्त, सर्व महानगरपालिका
आयुक्त तथा संचालक,
नगर परिषद प्रशासन संचालनालय, मुंबई
मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषद / नगरपंचायती

विषय :- मा. बाळासाहेब ठाकरे माजी सैनिक सन्मान योजना (माजी सैनिक व सैनिक विधवा / पत्नी यांना मालमत्ता करातून सूट) राबविण्याबाबत..

संदर्भ :-१) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१६/प्र.क्र.५९/नवि-२० दिनांक.०९/०९/२०२०

२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२०/प्र.क्र.१०१/ भाग-२/का.८ दिनांक.२३/११/२०२०

महोदय,

उपरोक्त विषयी महाराष्ट्र राज्यात अधिवास असणाऱ्या संरक्षण दलातील सर्व माजी सैनिक आणि सैनिक विधवा यांच्या करिता ग्रामविकास व नगर विकास विभागामार्फत दि.१८/०८/२०२० व दि. ०९/०९/२०२० च्या शासन आदेशान्वये विहीत करण्यात आलेल्या आदेशाचे एकत्रिकरण करुन मा. बाळासाहेब ठाकरे माजी सैनिक सन्मान योजना (माजी सैनिक व सैनिक विधवा / पत्नी यांना मालमत्ता करातून सूट) विहीत करण्यात आली आहे. परिणामत: ग्रामविकास विभाग तसेच नगर विकास विभागाचे अनुक्रमे शासन निर्णय दि. १८/०८/२०२० व दि. ०९/०९/२०२० अन्वये निर्गमित केलेले आदेश अधिक्रमित झाले आहेत. त्यामुळे आता खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. आता सामान्य प्रशासन विभागाने दि. २३/११/२०२० च्या शासन निर्णयानुसार मा. बाळासाहेब ठाकरे माजी सैनिक सन्मान योजना (माजी सैनिक व सैनिक विधवा / पत्नी यांना मालमत्ता करातून सूट) लागू केली असून सदर योजनेच्या अटी शर्ती सदर शासन निर्णयात नमूद करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार आता सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेल्या दि.२३/११/२०२० च्या शासन निर्णयातील नमूद अटी व शर्ती नुसार सदर योजना प्रभावीपणे राबवावी, अशा सूचना देण्यात येत आहेत.

२. सदर दि. २३/११/२०२० च्या शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली असून त्यानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना सर्व नगरपरिषद / नगरपंचायती यांना आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांनी द्याव्यात.

३. सदर योजनेची अंमलबजावणी सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि. २३/११/२०२० च्या मध्ये नमूद अटी व शर्ती नुसार होईल याची दक्षता सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायती व आयुक्त, सर्व महानगरपालिका यांनी घ्यावी.

४. सदर योजनेच्या अंमलबजावणी बाबतचा अहवाल संबंधित आयुक्त महानगरपालिका व मुख्याधिकारी नगरपरिषद / नगरपंचायत यांनी संबंधित जिल्ह्याच्या जिल्हासैनिक कल्याण अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात यावा.

आपला,

(शंकर जाधव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन-२८) मंत्रालय मुंबई
२) संचालक, सैनिक कल्याण विभाग, राष्ट्रीय युध्द स्मारकासमोर, घोरपडी, पुणे.

बाळासाहेब ठाकरे माजी सैनिक सन्मान योजना
(माजी सैनिक व सैनिक विधवा /पत्नी यांना
मालमत्ता करातून सूट)

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२०/ प्र.क्र.१०१/भाग-२/का.२८
मंत्रालय मुंबई ४०० ०३२
दि.२३/११/२०२०

वाचा :- १. ग्राम विकास विभाग, शासन अधिसूचना क्र.व्हीपीएम -२०१५/ प्र.क्र.१४०/पंरा-४, दि.३१/१२/२०१५

२. ग्राम विकास विभाग, शासन निर्णय, क्र.व्हीपीएम -२०२०/ प्र.क्र.९३/पंरा-४, दि.१८/८/२०२०

३. नगर विकास विभाग, शासन निर्णय, क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.५९/नवि.२०, दि.५/४/२०१६, दि.७/४/२०१६,दि.९/१/२०१७ व दि.९/९/२०२०

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्यात वास्तव्य करणाऱ्या संरक्षण दलाच्या सेवेतील माजी सैनिकानी देशासाठी प्राणाची बाजी लावून देशाचे संरक्षणाचे केलेले कार्य विचारात घेऊन ग्रामविकास विभागाने संदर्भाकीत दि.१८/८/२०२० च्या शासन निर्णयाद्वारे राज्यातील ग्रामीण स्वराज्य संस्थाच्या क्षेत्रात वास्तव्य करणाऱ्या माजी सैनिकांना मालमत्ता करातून सूट देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच नगर विकास विभागाने देखील संदर्भाकीत दि.९/९/२०२० च्या शासन निर्णयाद्वारे राज्यातील नागरी स्वराज्य संस्थाच्या कार्यक्षेत्रात वास्तव्य करणाऱ्या सर्व माजी सैनिकांना मालमत्ता करातून सूट देण्याचा निर्णय घेतला आहे.

माजी सैनिकांसाठी राज्याकडून राबविण्यात येणाऱ्या मालमत्ता करातून सूट देण्याच्या योजनांचे एकसुत्रीकरण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानूसार आता शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र राज्यात अधिवास असणाऱ्या संरक्षण दलातील सर्व माजी सैनिक आणि सैनिक विधवा यांच्या करीता ग्रामविकास विभाग व नगर विकास विभागामार्फत संदर्भाकीत अनुक्रमे दि.१८/८/२०२० व दि.९/९/२०२० च्या आदेशान्वये विहीत करण्यात आलेल्या आदेशाचे एकत्रिकरण करुन मा.बाळासाहेब ठाकरे माजी सैनिक **सन्मान योजना ( माजी सैनिक व सैनिक विधवा /पत्नी यांना मालमत्ता करातून सूट)** विहीत करण्यात येत आहे. परीणामत: ग्रामविकास विभाग तसेच नगर विकास विभागाचे अनुक्रमे शासन निर्णय दि.१८/८/२०२० व दि.९/९/२०२० अन्वये निर्गमित केलेले आदेश अधिक्रमित झाले आहेत.

२. सदर योजनेचे लाभार्थी होण्यासाठी खालील अटींची पुर्तता होणे आवश्यक आहे :-

अ. या योजनेचे लाभ मिळण्यासाठी सदर माजी सैनिक महाराष्ट्र राज्यात जन्मलेला असावा किंवा महाराष्ट्र राज्याचा किमान १५ वर्षे सलग रहिवासी असावा. त्याकरीता त्याने सक्षम प्राधिकाऱ्याकडून अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

ब. अशा करमाफीस पात्र ठरणाऱ्या व्यक्तीने संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्याकडून प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

क. अशी पात्र व्यक्ती राज्यातील एकाच मालमत्ते करीता करमाफीस पात्र राहील. तसे घोषणापत्र त्यांनी संबंधित जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्यांना सादर करणे आवश्यक राहील.

ड. या योजनेचे लाभ संबंधित माजी सैनिक व त्यांच्या पत्नी/ विधवा हयात असे पर्यंतच देय राहतील. तसेच अविवाहीत शहीद सैनिकांच्या बाबतीत त्यांचे आईवडील हयात असेपर्यंत हे लाभ देय राहतील.

इ. या प्रयोजनासाठी " माजी सैनिक " याचा अर्थ हा माजी सैनिक (केंद्रीय नागरी सेवा व पदांवर पुर्ननियुक्ती) सुधारणा नियम, २०१२ मध्ये विहीत केल्याप्रमाणे राहील.

३. या योजनेची अंमलबजावणी व त्यासाठी आवश्यक निधीची तरतूद प्रकरणपरत्वे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रातील मालमत्ता करीता नगर विकास विभाग व ग्रामीण स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रातील मालमत्ता करीता ग्रामविकास विभागाच्या मार्फत करण्यात येईल. नागरी स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात या योजनेचे लाभ देण्यासाठी आवश्यकतेनुसार संबंधित अधिनियम / नियम या मध्ये आवश्यक सुधारणा करण्याची कार्यवाही नगर विकास विभागामार्फत करण्यात यावी. तसेच ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात या योजनेचे लाभ देण्यासाठी आवश्यकतेनुसार संबंधित अधिनियम / नियम या मध्ये आवश्यक सुधारणा करण्याची कार्यवाही ग्राम विकास विभागामार्फत करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२०११२४१६०६३०११०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Sarita Rishi Bandekar Deshmukh

(श्रीमती सरिता बांदेकर-देशमुख)
उप सचिव , महाराष्ट्र शासन

प्रत,
१. मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव, राजभवन,मुंबई
२. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई
३. सर्व मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
४. मा.विरोधी पक्ष नेते, विधान परीषद/ विधान सभा, महाराष्ट्र विधान मंडळ, मुंबई
५. मा.मुख्य सचिव यांचे वरीष्ठ स्वीय सहाय्यक
६. सर्व अतिरिक्त मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय,मुंबई
७. सर्व संन्माननीय विधान परीषद / विधान सभा सदस्य व संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य
८. आयुक्त सर्व महानगर पालीका,
९. आयुक्त तथा संचालक, नगर परीषद प्रशासन संचालनालय,वरळी, मुंबई
१०. सर्व मुख्य कार्य अधिकारी, जिल्हा परीषद
११. निवडनस्ती (का.२८/ सामान्य प्रशासन विभाग)
संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे | संचालक, सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, औरंगाबाद



-----xxx-----

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांका संकिर्ण-२०१५/प्र.क्र.३०५/नवि-२०
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ११ जानेवारी, २०१७.

वाचा:- मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा अध्यादेश, २०१७ या अध्यादेश क्र.३, दिनांक ०८.०१.२०१७

शासन निर्णय:-

मुंबई महानगरपालिका अधिनियम १९८८ ,व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांतर्गत अनधिकृत बांधकामाच्या बाबतीत प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या दुप्पट दराने शास्ती आकारण्याबाबत तरतूद होती. बांधकाम व्यवसायिकाकडून काही प्रकरणी इमारतीचे अनधिकृत बांधकाम झाल्यानंतर त्यातील सदनिका व गाळे गरजू खदेरीदारांना विकण्यात येतात. संबंधित खरेदीदारांकडून या इमारतींमधील सदनिका व गाळे संबंधित कायद्यांमधील तरतूदींनुसार यथोचितरित्या अधिकृत आहेत, या गैर समजूतीतून खरेदी केल्या जातात.

२. अनधिकृत बांधकामांना उपरोक्त प्रमाणे शास्तीची आकारणी करण्यात आल्यानंतर ती संबंधित खरेदीदारांकडून वसूल केली जाते. या खरेदीदारांची कोणतीही चूक नसताना त्यांना शास्तीची रक्कम भरावी लागते. या पार्श्वभूमीवर या तरतूदीमध्ये सुधारणा करण्याच्या अनुषंगाने मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०१७ (अध्यादेश क्र.३) दिनांक ०८.०१.२०१७ अन्वये मुंबई महानगरपालिका अधिनियम व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये सुधारणा करण्यात आली असून हे शास्तीचे अधिकार महानगरपालिकांना देण्यात आले आहेत.

३. उपरोक्त अध्यादेशान्वये करण्यात आलेल्या सुधारणांच्या अनुषंगाने सदर अधिकारांचा वापर करताना सर्व महानगरपालिकांमध्ये एक वाक्यता असावी व अल्प उत्पन्न घटकांना न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून तसेच अनधिकृत निवासी बांधकामावर प्रभावी आळा बसविण्याकरिता शास्तीची पुढीलप्रमाणे आकारणी करण्याबाबत राज्यातील सर्व महानगरपालिकांना निदेश देण्यात येत आहेत:-

आकारणी व कर संकलन कार्यालय
क्रमांक- ६६२८
०८/०३/२०१७

CE/ASCTO

मा. आयुक्त

1.3.17

| अ.क्र. | निवासी बांधकामाचे क्षेत्रफळ | आकारावयाच्या शास्तीचा दर |
|---|---|---|
| | | शास्तीची आकारणी करण्यात येऊ नये |
| १) | ६०० चौ.फुटापर्यंतचे निवासी बांधकाम | प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या ५०% दराने शास्ती आकारण्यात यावी . |
| २) | ६०१ ते १००० चौ. फुटापर्यंतचे निवासी बांधकाम | प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या दुप्पट दराने शास्ती आकारण्यात यावी(सध्याच्या दराने). |
| ३) | १००१ चौ. फुटापुढील निवासी बांधकाम | |

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०११११५५७११३६२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Jayasingrao N Patil

Digitally signed by Jayasingrao N Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Jayasingrao N Patil
Date: 2017.01.11 16:01:33 +05'30'

(ज. ना. पाटील)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.विरोधी पक्षनेते, दोन्ही सभागृह, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
२) सर्व सन्मानीय विधानसभा / विधानपरिषद व संसद सदस्य
३) मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव
४) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
५) सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६) मा.राज्य निवडणूक आयोग यांचे कार्यालय
७) मा.मुख्य सचिव यांचे वरीष्ठ स्वीय सहाय्यक
८) मा.लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय
९) मुख्यमंत्री महोदय यांचे जनसंपर्क अधिकारी
१०) राज्यातील सर्व महानगरपालिकांचे आयुक्त
११) निवडनस्ती (नवि-२०)

सोलापूर महानगरपालिका,

संदर्भ :- 1) रिट याचिका क्र.10152/2024 CREDAI सोलापूर वि. सोलापूर महानगरपालिका व इतर

2) मा.प्रशासक (मा.स्थायी समिती संवर्ग) ठराव क्र.160 दि.03/10/2024

आ.क्र.उआ/क./ 2-4
उपायुक्त (कर) यांचे कार्यालय
दि.9/10/2024

-: आदेश :-

उपरोक्त संदर्भ 1 यास अनुसरुन संदर्भ क्र.2 पारित झालेल्या ठरावानुसार खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

आजला मालमत्ता कर विभागाकडे हस्तांतरण प्रकरणी, स्थायी समिती ठराव क्र. २४ दि.२०/०५/२००९ व मनपा ठराव क्र.२४४ दि.२५/०२/२००९ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अंतर्गत अनुसुची ड प्रकरण ८ नियम १ नुसार शिर्षक / बदलाचे हस्तांतरण सुचित करण्यासाठी व्यवहार मुल्याच्या १% शुल्क आकारण्यात येत आहे. तथापी सदर दोनही ठरावामध्ये विकसन कराराच्या नोंदणी बाबत व घ्यावयाच्या शुल्कावाबत स्पष्टता नाही. याकरीता खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

विकसन कराराच्या नोंदी करीता सध्या आकारण्यात येणाऱ्या विकसन करारात नमूद रकमेच्या अथवा ज्या जमिनीचा विकास करावयाचा आहे त्या जमिनीच्या Ready Recknor नुसार होणारे मुल्यांकन यापैकी जी रक्कम अधिक असेल अशा रकमेच्या १% हस्तांतरण शुल्क ऐवजी संदर्भ क्र.2 अन्वये पारित झालेल्या ठरावानुसार, विकसन करारात नमूद रकमेच्या किंवा जर अशी रक्कम नमूद नसेल तर विकास करावाच्या जमिनीच्या Ready Recknor Value च्या ०.२% इतके किंवा र.रु.२०,०००/- प्रति १ कोटी याप्रमाणे विकसन करार नोंदणी शुल्क आकारण्यात यावे.

मालमत्ता कर विभागाने सदर आदेशाची अंमलबजावणी आदेशाच्या दिनांकापासून करावी.

(आशिष लोकरे)
उपायुक्त (कर)
सोलापूर महानगरपालिका

प्रत,
मालमत्ता कर विभाग

# सोलापूर महानगरपालिका

जा.क्र.उआ/मुख्यालय/वे/ ८४
उपायुक्त, (मु) यांचे कार्यालय
सोलापूर दि.१३/ ०७/ २०२१

-: परिपत्रक :-

सोलापूर शहर परिसर पर्जन्यछायेचा व दुष्काळी भाग आहे. येथील सरासरी पर्जन्यमान्य 545 मि.मी. इतके आहे. सोलापूर शहरास उजनीतून पाणी पुरवठा हा साधारण 100 कि. मि लांबीच्या पाईपलाईन मधून होतो. याकरिता मालमत्ता करामध्ये पावसाचे पाणी फिल्टर करून कूपनलिकेत सोडणाऱ्या (Rain Water Harvesting), पावसाचे पाणी संपामध्ये साठवणे व त्याचा पुनर्वापर (Rain Water Storage) तसेच उर्जाबचतीसाठी सौरउर्जेचा वापर करणाऱ्या मिळकतधारकांसाठी मालमत्ता करामध्ये खालील प्रमाणे सुट देणेबाबत मा.आयुक्त यांची मान्यता असून, सन-2021-2022 चे अंदाजपत्रक 'अ' आणि 'क' यामध्ये करापासून मिळणारे उत्पन्न यामध्ये नमुद करण्यात आलेले आहे.

1) पावसाचे पाणी फिल्टर करुन कुपनलिकेत सोडणाऱ्या (Rain Water Harvesting) मिळकतधारकांसाठी मिळकत करामध्ये 2% सुट,
2) पावसाचे पाणी संपामध्ये साठवणे व त्याचा पुनर्वापर करणे (Rain Water Storage) मिळकतधारकांसाठी मिळकत करामध्ये 3% सुट
3) उर्जाबचतीसाठी सौरउर्जाचा वापर करणाऱ्या मिळकत कर धारकांसाठी मिळकत करामध्ये 5% सुट

- **तरी उपरोक्त प्रमाणे मनपा हद्दीतील मिळकतधारकांसाठी मालमत्ता करामध्ये सूट द्यावयाचे प्रक्रियेमध्ये अधिकारी व कर्मचारी यांनी खालील प्रमाणे करावयाची कार्यपध्दती..**

1) प्रभारी अतिरिक्त मालमत्ता कर अधिकारी - प्रथमत: मिळकतदारांनी दाखल केलेले ऑनलाईन अर्ज व अर्जासोबत जोडलेल्या संबंधीत कागदपत्रांची पडताळणी /छाणणी करणे.
2) संबंधित पेठेतील कर निरिक्षक - अर्जदारांच्या संबंधीत कागदपत्रांची पडताळणीनुसार मिळकत जागेवर कार्यरत असलेल्या प्रकल्पाची सद्यस्थिती पाहून सदर प्रकल्पाचे जिओ टॅग फोटोसह तसेच तत्सम अहवाल ऑनलाईन प्रणालीद्वारे सादर करणेची कार्यवाही ठेवावी.

वरील संबंधित सर्व कागदपत्रांची पुर्तता व मिळकत जागेवर कार्यरत असलेल्या प्रकल्पाची सद्यस्थितीचा अहवाल सादर केल्यानंतर मिळकत करामध्ये सुट देण्याबाबत योग्य ती पुढील कार्यवाही ठेवण्यात यावी.

(एन.के.पाटील)
उपायुक्त (मुख्यालय)
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

प्रति, -
(१) प्र.अति.मालमत्ता कर अधिकारी
(२) संबंधित पेठेतील कर निरिक्षक
(३) मालमत्ता कर विभाग

प्रत,-
**सहा.आयुक्त (मालमत्ता कर विभाग)**